0058167

FORM-1A

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई शहर पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. पहिली खबर क्र. FIR No. 19 वर्ष Year 2024 दिनांक Date 12/06/2024

2. (i) अधिनियम Act भ्रष्टाचार प्रतिबंध अधि 1988 कलमे Sections कलम 07
   (ii) अधिनियम Act ......... कलमे Sections .........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections .........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day शनिवार तारीख पासून Date from 04/03/2023 वेळ Time 02:18 तारीख पर्यंत Date to ......... वेळ Time .........
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P.S. तारीख Date 12/05/2023 वेळ Time –
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. 24/2024 तारीख Date 12/06/2024 वेळ Time 18:15

4. माहितीचा प्रकार Type of Information : ......... लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P.S. – चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. –
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name मरीन ड्राईव्ह ठिकाणाचे नंबर No. if any बी.डी. गल्ली Ward सोमाणी रस्त्याचे नाव Name of road जंक्शन परिसर
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ......... गाव Village मुंबई, पोस्ट Post ........., तालुका Taluka ........., जिल्हा Dist ........., राज्य State .........
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station –, तालुका Taluka –, जिल्हा Dist –, राज्य State –

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address
   (a) नाव Name मनोज शिरगे (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name हिंदुराव शिरगे
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age 41 वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality – फोन नं. Phone No. 9527900963
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ......... दिल्याचा दिनांक Date of Issue ......... दिल्याचे ठिकाण Place of Issue ......... (f) व्यवसाय Occupation नोकरी (पोलीस निरीक्षक)
   (g) धर्म Religion हिंदू जात Caste – जनजात Sub-Caste –
   (h) पत्ता Address : ........., गल्ली / सर्व्हे नं. Ward बी3 घर / नाव नं. House/Name No. नं. 5, फोन / मो. नं. Phone/M. No. ......... पॅन नं. PAN No. ......... वोटर्स नं. Card No. .........
   रस्त्याचे नाव Road 'ल' जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place अधिकारी गाव Village हॉस्टेल पोस्ट Post पोलीस पो. स्टे. P. Stn. मुख्यालय
   तालुका Taluka मुंबई-18 जिल्हा Dist. विभाग-03 बिल्डिंग, सर State ......... जहांगीर बोमनवाला रोड, वरळी सध्याचा पत्ता Present Address

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   पोलीस शिपाई क्रमांक 117606/ सुरज पृथ्वीराज गायकवाड वय-31 वर्षे नेमणूक - तत्कालीन मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे रा.ठि. रूम नं.59, दुसरा माळा, ओल्ड पोलीस लाईन, हंसराज लेन भायखळा पो ठाण्याच्या मागे मुंबई 27.

Y.P.P.-3,200 Bk.-(25×6=150 Lvs)-3-2021-PA3-(K) 347

फिर्याद दि. १२/०६/२०२४

श्री. मनोज सिंदुराव जिरगे वय - ५१ वर्षे व्यवसाय - नोकरी (पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई) रा. बी. बेड नं ३, अधिकारी हॉस्टेल, पोलीस मुख्यालय 'ए' विभाग - ०३, बिल्डींग, सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई - ४०००१८ मोबाईल नंबर ९५२७९००९६३ माझ्या स्वतःच्या पानावर नोंदविण्यात आलेला जबाब हाच गुन्ह्याची प्रथम खबर समजण्यात येत आहे.

(सही)
१२/०६/२४

समक्ष

(सही)
(सुनिता दिघे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग
मुंबई

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ चौकशी अंती

Reasons for delay in reporting by the complainant/informant

9.* चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

........ - ........

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........

Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील वर नमुद तारिख वेळी व ठिकाणी यातील कॉलम क्र. 07 मधील आरोपीताने पिडीत विघ्नेश किशन साबु पोलीस कारवाईची भिती दाखवुन 25001/- रुपयांची मागणी केली. सदरचे पैसे आरोपीतो किरण अतिश जाधव यांचे खात्यावर गुगल पे द्वारे स्विकारल्याचे निष्पन्न झाले आहे म्हणुन तक्रारदार यांनी चौकशी करुन सरकारतर्फे पो. शि. क्र. 117606/ गायकवाड यांनी विरोधात तक्रार दिल्याने भ्रष्टाचार प्रतिबंध

13. केलेली कार्यवाही – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : अधि 1988 कलम 07 अन्वये गुन्हा नोंद.

........

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,

........

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........, जिल्हा ........, राज्य ........

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.) ........ Rank ........ No. ........ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........ (3) Transferred to P. S. ........ District ........ on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली, फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name ........ सुनिता पांडुरंग दिवे
पदनाम Rank ........ पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ला. प्र. वि. मुंबई विभाग.
Posting
Code No. of I. O. ........

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत, 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अमलदार, 5. स्थळ प्रत.

Copy to 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

फिर्याद दि.१२/०६/२०२४

श्री. मनोज हिंदुराव जिरगे वय – ४१ वर्षे व्यवसाय– नोकरी (पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई) रा. ठी. बेड नं.५१ अधिकारी हॉस्टेल,पोलीस मुख्यालय 'ल' विभाग–३ बिल्डींग. सर पोचखानवाला रोड, वरळी, मुंबई –४०००१८. (मो.नं.९५२७९००९६३)

---

मी, वरील प्रमाणे असुन सरकारतर्फे फिर्यादी होवुन फिर्याद देतो की, मी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई येथे पोलीस निरीक्षक (एटप) म्हणुन कार्यरत आहे. दि. १९/०७/२०२३ रोजी जा.क्र. ६६९४ ला.प्र.वि./बृमुवि/पडताळणी क्र.२१२३/२०२३ मा. अपर पोलीस आयुक्त यांचे कार्यालय, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग, वरळी मुंबई. या जावक क्रमांकाने पडताळणी क्र.२१२३/२३ (आर.आय. ५३२३/२३ दि.१२/०५/२०२३) मधे योग्य ती कार्यवाही करुन अहवाल कार्यालयास सादर करणेबाबत आदेशीत केले आहे. (पृष्ठ क्र ०१ ते ८० )

उपरोक्त संदर्भाने खालीलप्रमाणे कार्यवाही केली आहे.

मरिन ड्राईव्ह पोलीस ठाणे बृहन्मुंबई हद्दीतील दि.०३/०३/२०२३ रोजी घडलेल्या घटनेसंदर्भात नवभारत टाईम्स या वृत्तपत्राने '' **समुद्र किनारे बैठने पर देनी पडी पुलिस को रिश्वत होगी जांच**'' या मथळ्याखाली दि.०८/०३/२०२३ रोजी न्युज प्रसारीत करण्यात आली होती. (पृष्ठ क्र ०६) नमुद न्युजची मा. अध्यक्ष महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाने दखल घेत त्या संदर्भात सुमोटो याचिका क्र १२१४/१३/१६/२०२३ दाखल करून घेतलेली आहे. **(पृष्ठ क्र ०८ ते १२ )**

मा. महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई येथे सुमोटो याचिकेची दि १२/०४/२०२३ रोजी सुनावणी होवुन सदरचे प्रकरण हे भ्रष्ट्राचाराच्या आरोपाशी निगडीत असल्याने प्रकरणाची निपक्षपातीपणे चौकशी करणे आवश्यक असल्याचे मा. आयोगाने नमुद केले आहे. सदरचे प्रकरण हे संबधित कागदपत्रासह पुढील कायदेशिर कार्यवाहीकरिता मा.डॉ. अभिनव देशमुख, अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशिक विभाग मुंबई यांचेकडुन मा. महासंचालक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई येथे जा.क्र.१९२/अपोआ/दप्रावि/वा/२०२३ दि ०५/०५/२०२३ अन्वये पुढील कार्यवाहीकरिता वर्ग झालेले आहे. **(पृष्ठ क्र ८१ ते ८२ )**

सदरची घटना ही दि. ०३/०३/२०२३ रोजी मरिन ड्राईव्ह पोलीस ठाणे हद्दीमध्ये मरिन ड्राईव्ह चौपाटीवर घडली असल्याने नमुद घटनेतील प्रत्यक्ष कर्तव्यावर हजर असलेले साक्षीदार १) संतोष पोपट आढाव पो.शि.क्र. १४.०७८७ नेमणुक मरिन ड्राईव्ह पोलीस ठाणे मुंबई दि. २१/०७/२०२३ रोजीचा २) संदीप दशरथ पाटील पो.शि.क्र. १४.१११ नेमणुक मरिन ड्राईव्ह पोलीस ठाणे मुंबई दि.२४/०७/२०२३ रोजीचा. तसेच गैरअर्जदार लोकसेवक सुरज पृथ्वीराज गायकवाड पो.शि.क्र.११.७६०६ यांचा जबाब नोंदविण्यात आलेला आहे. **(पृष्ठ क्र ८३ ते ९०)**

चौकशी मधील प्राप्त कागदपत्रामध्ये अतिश जाधव याचे इंडियन बॅक सोलापुर शाखेचे दि. ०१/०१/२०२२ ते दि २९/०३/२०२३ रोजीचे विवरणपत्राचे अवलोकन केले असता दि ०४/०३/२०२३ रोजी २५००/–रु हे **UPI/306394407377/UPIXXXXX19774/vigneshkishan1993@oksbi**. द्वारे आतिश जाधव यांना प्राप्त झाल्याचे दिसुन येत आहे. **(पृष्ठ क्र ३६ ते ८०)**

अतिश रविंद्र जाधव यास चौकशीकामी हजर राहणेबाबत जा.क्र.७९८८/२०२४ दि.०८/०९/२०२३ रोजी व्हॉट्सअॅप द्वारे पत्र पाठविले असता त्यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. म्हणुन अतिश जाधव हा सोलापुर येथे राहावयास असलेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग सोलापुर याचे मदतीने नमुद पत्राची बजावणी

Sunstudgle PI 12/06/2024

करण्यात आली. त्यास अनुसरून लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांनी अहवाल सादर केलेला आहे. **(पृष्ठ क्र ९१ ते ९३)**

दि.२१/०९/२०२३ रोजी अतिश रविंद्र जाधव रा.सोलापुर हा चौकशीकामी कार्यालयास हजर झाल्याने त्यांचा सविस्तर जबाब नोंदविण्यात आला आहे. त्याने त्याचे जबाबात सांगितले की, दि. ०४/०३/२०२३ च्या पहाटे दोनच्या सुमारास २५००/–रू गुगलपे द्वारे प्राप्त झाले. परंतु याबाबत त्याला सायंकाळी ०५.३० वाजताच्या सुमारास त्याचा भाऊ प्रविण जाधव याचेकडुन समजले. त्याबाबत त्याला काहिही माहिती नव्हती. त्या दिवशी त्यांचे व सुरजचे सहा ते सात वेळा फोनवर बोलणे झाले. तसेच त्यांच्यामध्ये एकमेंकाला मॅसेजही झाले आहेत परंतु घडलेल्या घटनेबाबत त्याने अतिशला काहिही कल्पना दिलेली नाही. सदरचे पैसे कश्याचे आहेत हे त्याला माहित नसल्याने तसेच ते पैसे अतिश याने परत केल्यास त्याचे अकाउंटला परत काही अडचण निर्माण होईल या भितीने त्याने ते पैसे परत केले नाहीत''. तसेच अतिश जाधव याचे कडुन त्याची काही कागदपत्रे प्राप्त करण्यात आली. **( पृष्ठ क्र ९४ ते ११३ )**

मरीन ड्राईव्ह पोलीस ठाणे येथे अतिश जाधव याचा दि.०३/०४/२०२३ रोजी जबाब नोंद करण्यात आला आहे. नमुद जबाबामध्ये मो.नं– ८४८४८१८०६७ याचा उल्लेख असल्याने नमुद मोबाईल क्रमांक धारक तेजस ज्ञानेश्वर तेलरांधे, वय–२७ वर्षे, व्यवसाय– नोकरी(सॉफ्टवेअर डेव्हलपर), रा.ठी. यशवंत कॉलनी, जी.एम.मोटर्स, नागपूर रोड, वर्धा, ता.जिल्हा. वर्धा, सध्या रा.ठी. स्टांझा लिव्हींग, डरहम हाऊस, रूम नं. ५०३, व्हाईट फिल्ड रोड, व्हाईट फिल्ड, बेंगलुरु राज्य कर्नाटक.(मो.नं.८४८४८१८०६७) पॅन नं. BJDPT8189E याचेकडे चौकशी करून विघ्नेश किशन याचेकडुन जूपजजमत वर पोस्ट केलेल्या स्क्रिनशॉटची प्रत हस्तगत केली आहे. नमुद स्क्रिनशॉटवर अतिश जाधव यांचे नाव तसेच त्यांचे मोबाईल क्रमाक ९७३०९७९८९७ तसेच विघ्नेश किशन यांचे नाव व २५००/–रु चा व्यवहार झाल्याचे दिसुन येत आहे. तसेच सदरची पोस्ट ही विघ्नेश किशन या व्यक्तीने पोस्ट केली होती. त्यावर त्याने रिपोस्ट केलेली आहे असे सांगितले. **(पृष्ठ क्र ११४ ते १२१)**

चौकशीमध्ये पुढे नोडल ऑफीसर एन. पी. सी. आय. यांना दि. ०१/०२/२०२४ रोजी जा. क्र. ८४९/२४ अन्वये **UPI/306394407377/UPIXXXXX19774/vigneshkishan 1993@oksbi** या यु.पी.आय.आय.डी ची माहिती मिळणेबाबत पत्र व्यवहार करून विघ्नेश किशन यांचा मोबाईल नंबर व दि. ०३/०४/२०२३ रोजीचे एय.बी.आय बॅकेचे खाते विवरण प्राप्त केले. **(पृष्ठ क्र १२२ ते १३०)**

विघ्नेश किशन हा नोकरी करिता दिल्ली येथे असल्याने त्यास चौकशीकरिता कार्यालयात हजर राहणे शक्य नसल्याने त्याने ऑन लाईन मोबाईलद्वारे जबाब नोंदविण्याची विनती केल्याने दि.२६/०२/२०२४ रोजी त्यांना व्हिडीओ कॉल करून मोबाईलद्वारे जबाब नोंदविण्यात आला असुन त्यांचे सागणे की, '' दि. ०३/०३/२०२३ रोजी मुंबई ते मुबई मध्ये होते त्यावेळी त्याचा एक दिल्लीचा मित्र मुंबईमधे आला होता. मुंबई येथील मरीन ड्राईव्ह चौपाटी बाबत त्यांनी ऐकले होते की, सायकाळचे वेळेस बसण्यासाठी खुप चांगली जागा आहे. त्यामुळे ते त्यांचे मित्रासोबत मरीन ड्राईव्ह चौपाटी येथे टॅक्सीने फिरण्यास गेले होते. त्यावेळी साधारण एक ते दिड वाजण्याच्या सुमारास ते व त्याचा मित्र मरीन ड्राईव्ह चौपाटी येथे पोहोचले. ते व त्यांचा मित्र तेथे बसले असताना काही पोलीस तेथे आले व 'आम्हाला येथे बसु नका', असे म्हणु लागले, 'त्यावेळी आम्ही बस थोडा वेळ येथे थाबुन परत जाणार आहोत' असे सांगत होतो, परंतु पोलीस काही ऐकत नव्हते त्यानंतर काही वेळाने आणखी एक पोलीस तेथे आला व त्याने पोलीस ठाणेस चला तुमच्यावर कार्यवाही करणार' असे म्हणालेने ते व त्यांचा मित्र घाबरुन गेलो नंतर त्याने व त्याचे मित्राने पोलीसाला समजावु लागले व माफ करा येथुन निघुन जातो असे सांगत असताना पोलिसाने हे प्रकरण येथेच मिटवायचे असेल तर दोन हजार पाचशे रुपये दयावे लागतिल असे म्हणुन त्याला ९७३०९७९८९७ हा मोबाईल नबर दिला. त्याने त्याचे नबरवर गुगल पे द्वारे २५००/– रु पाठविले नंतर ते व त्यांचा मित्र असे दोघे तिथुन निघुन आलो.

Suwadyle PI 12/06/2024 2

परंतु मरिन ड्राईव्ह चौपाटी ही पर्यटकांसाठी फिरण्यास चांगली जागा असुन देश विदेशातुन लोक येथे फिरण्यासाठी येत असतात अशावेळी पोलीसांनी येथे बसण्यासाठी त्याचेकडुन २५००/– रु घेतल्याने त्याला राग आला होता व त्याने त्याच्या भावना व्यक्त करण्यासाठी त्याचे ट्विटर अकांऊट **viggyvide** वर पोस्ट करुन त्याचा राग व्यक्त केला". **(पृष्ठ क.१३१ ते १४१)**

एकंदरीत झालेल्या चौकशीमध्ये दि.०४/०३/२०२३ रोजी पहाटे ०२.१८ वाजता विघ्नेश किशन हे आपले मित्रासोबत मरिन ड्राईव्ह चौपाटी येथे फिरण्यास आले असता, **लोकसेवक पोलीस शिपाई सुरज पृथ्वीराज गायकवाड यांनी विघ्नेश किशन यांना पोलीस कारवाईची भिती घालुन २५००/–रू मागणी केली. सदरची रक्कम पोलीस शिपाई सुरज गायकवाड यांनी त्यांचा नातेवाईक/मित्र अतिश जाधव यांचा मो क ९७३०९७९८९७ वर विघ्नेश किशन यांचे मोबाईल वरून गुगलपे दुवारे २५००/–रू स्विकारल्याचे निष्पन्न झाले आहे.**

नमुद प्रकरणातील चौकशीची इतर कागदपत्रे **( पृष्ठ क १४२ ते २७७ )** असे आहेत.

तरी लोकसेवक सुरज पृथ्वीराज गायकवाड पो.शि.क्र.११.७६०६ तत्कालीन नेमणुक मरिन ड्राईव्ह पोलीस ठाणे मुंबई यांनी दि.०४/०३/२०२३ रोजी पहाटे ०२.१८ वाजता विघ्नेश किशन हे त्याचे मित्रासोबत मरिन ड्राईव्ह चौपाटी येथे फिरण्यास आले असता, ते रात्री उशिरा ०२.०० वा च्या सुमारास मरीन ड्राईव्ह कट्टयावर बसले म्हणुन पोलीस कारवाईची भिती घालुन २५००/– रूपये ची मागणी केली. सदरचे पैसे त्याचा नातेवाईक/मित्र अतिश जाधव यांचा मो क ९७३०९७९८९७ वर पाठविण्यास सांगितले त्यावरून विघ्नेश किशन याने त्याचे मो.न. ९५८२२१९७७४ यावरून मो क ९७३०९७९८९७ वर २५००/– रूपये पाठविले.

एकंदरीत झाले चौकशीवरून पो.शि.गायकवाड याने विघ्नेश किशन याचेकडे लाचेची मागणी करून सदरचे पैसे त्याचा मित्र अतिश जाधव याचे खात्यावर गुगल पे दुवारे स्विकारल्याचे निष्पन्न झाले आहे. म्हणुन माझी सरकारतर्फे फिर्यादी होवुन लोकसेवक श्री सुरज पृथ्वीराज गायकवाड पो.शि.क्र. ११.७६०६ तत्कालीन नेमणुक मरिन ड्राईव्ह पोलीस ठाणे, मुंबई यांचे विरूद्ध **भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ कलम ७** अन्वये तक्रार आहे.

समक्ष,

Sunitadyk
12/06/2024

( सुनिता दिघे )
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई